# राळेगण सिद्धी
## एक अल्पसा परिचय



'पद्मभूषण'
मा. अण्णा हजारे



**राळेगणसिद्धी** हे 2500 लोक वस्तीचे दुष्काळी गाव आहे. वर्षाला 400 ते 500 मि.मि. पाऊस पडतो. जो राज्याच्या काही भागात एका दिवसात पडतो. एकतर कमी पाऊस पडतो आणि जो पाऊस पडतो ते पाणी कुठेही अडविले नसल्यामुळे वाहून जात होते. त्यामुळे एप्रिल, मे महिन्या मध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई भासत होती. गावच्या एकुण भौगोलिक क्षेत्रापैकी लागवडीखाली असणाऱ्या 1700 एकर जमिनीपैकी फक्त 300 ते 400 एकर जमिनीला एका पिकाला पुरेल एवढेही पाणी पुरत नव्हते. त्यामुळे गावच्या 70 ते 80 टक्के लोकांना वर्षाला पुरेल एवढे धान्य उत्पादन होत नसल्याने हाताला काम नाही, पोटाला भाकरी नाही म्हणून गावचे लोक बाहेर मजूरीसाठी जात होते. मोठ्या प्रमाणात लोक अर्धपोटी जीवन जगत होते.

1940 ते 1950 च्या दरम्यान गावात हाताला काम नाही, पोटाला पुरेशी भाकरी नाही अशा अवस्थेत उदर निर्वाहाचे साधन म्हणून गावात 35 ते 40 दारूच्या भट्ट्या सुरू झाल्या. अशा परिस्थितीमध्ये गाव चालले होते. अशा गावात बदल घडवून आणण्यासाठी परदेशामधून देणग्या न घेता, राज्यातूनही कोणा उद्योगपतीच्या देणग्या न घेता फक्त गावचे लोक संघटित झाले. राजकिय पक्ष-पार्टींचे राजकारण गावाच्या बाहेर ठेवले आणि शासनाची पाणलोट क्षेत्र विकासाची आणि ग्रामविकासाची योजना संघटितपणे राबविण्यास सुरुवात केली. गावच्या लोकांचा सहभाग वाढविण्यासाठी प्रत्येक घरातून सार्वजनिक कामासाठी महिन्यातून दोन माणसाने एक दिवस श्रमदान करावे असा ग्रामसभेचा निर्णय झाला. गावच्या विकास कामांसाठी लोकांना फक्त शब्दाने ज्ञान सांगून होणार नाही. जी माणसे अर्धपोटी आहेत त्यांच्या पोटाला पुरेशी भाकरी मिळत नसेल तर ते ऐकणार नाहीत. भाकरीचा प्रश्न सोडविण्यासाठी पाणलोट क्षेत्र विकास हा चांगला पर्याय असल्याने गावात पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमाला प्राधान्य देण्यात येऊन काम सुरू केले. शासकीय योजना, लोकांचा सहभाग आणि गरज पडेल तिथे बँकेतून कर्ज घेतले आणि अशा त्रिवेणी संगमामुळे गावच्या विकासाला गती मिळत गेली. गावाचा विकास करताना निसर्गाचे शोषण करून केलेला विकास शाश्वत नाही. असा विकास कधीतरी विनाश ठरणार. निसर्गाने दिलेल्या देणगीचा विकास


ग्रामसभा

करून व्यक्ती, परिवार, आणि गावाचा विकास हा खरा शाश्वत विकास आहे. यासाठी पाणलोट क्षेत्र विकास हा पर्याय आहे.

**पाणलोट क्षेत्र विकासाचे** काम सुरू झाल्यापासून गावात मातीच्या 45 नाला बर्डींग केल्या. 10 सिमेंट बंधारे बांधले. 16 गँबियन बंधारे बांधले. एक मोठा पाझर तलाव केला. 300 एकर माळराणाच्या जमिनीवर 1X1 मीटरच्या डीप सिसिटी केल्या. गावातील पावसाच्या पाण्या बरोबर वाहून जाणारी माती जागेवरच रहावी म्हणून लूज


सिमेंट बंधारा


सीसीटी


पाझर तलाव


चेक डॅम


शेततळे


माती नाला बंधारा


विहीर


गॅबीयन बंधारा


पुर्नभरण विहीर

बोल्डर स्ट्रक्चर केले. गावामध्ये तीन लक्ष वृक्ष लागवड करून ती जगवली. त्यासाठी सर्व ग्रामस्थांनी जनावरे उघड्यावर चारण्यासाठी सोडायची नाही (चराईबंदी) असा निर्णय घेतला. पडिक जमिनीवर वाढलेला चारा कापून आणून जनावरांना द्यावा. गवत वाढल्यामुळे गावातील सुपीक माती जी जमिनीची धूप होऊन नद्यांमध्ये, धरणांमध्ये वाहून जात होती ती माती (टॉप सॉईल) गावातच थांबली. याप्रमाणे गावांमध्ये माथा ते पायथा या पद्धतीने माती आणि पाणी गावात घडविण्याचा प्रयत्न केला त्यामुळे पावसाचे वाहून जाणारे पाणी आणि पाण्याबरोबरच वाहून जाणारी सुपीक माती गावातच

थांबले. जमिनीमध्ये भूगर्भातील पाण्याची पातळी वाढली. पूर्वी गावात फक्त 35 विहिरी होत्या आता गावात 135 विहिरी झाल्या आहेत. पूर्वी 300 ते 400 एकर जमिनीमध्ये एका पिकाला पाणी मिळत नव्हते तेथे आज 1200 एकर जमिनीवर दोन पिके मिळू लागली आहेत. पूर्वी वर्षाला पुरेल एवढे धान्य उत्पादन होत नव्हते म्हणून बाहेरून




धान्य घ्यावे लागत होते. आता गावाला अन्नधान्य पुरे होऊन बाहेर विक्रीला जाऊ लागले आहे. भाजीपाला, कांदा उत्पादन वाढले. दरवर्षी 100 ते 150 ट्रक कांदा बाहेर विक्रीसाठी जाऊ लागला. पूर्वी 300 ते 400 लिटर दूध बाहेर जात नव्हते तेथे आज दररोज 6 हजार लिटर दूध बाहेर जाते. त्यामुळे दररोज दोन लाख रुपये गावात येऊ लागले व गावाची अर्थव्यवस्था बदलली. पूर्वी बेरोजगारीचा प्रश्न निर्माण झाला होता. आता गावातील तरूण दुग्ध व्यवसायाकडे वळल्यामुळे बेरोजगारीचा प्रश्न सुटला. पूर्वी मजूरीसाठी बाहेर लोक जात होते. परंतू आता गावात कामासाठी चार मजूर मिळत नाहीत. पूर्वी गावामध्ये झोपड्यांची घरे होती. आज मोठ्या प्रमाणावर लोकांनी आरसीसी ची घरे बांधली आहेत. पूर्वी 1935 च्या आसपास गावात कोणी नवीन पायडल सायकल आणली तर ती सायकल कशी आहे हे पाहण्यासाठी लोक जात असत. आज चारशे घरांच्या गावांमध्ये 215 मोटर सायकली आल्या आहेत. तसेच 52 कार, 11 ट्रॅक्टर, 25 टेम्पो आले आहेत. कारण गावची अर्थव्यवस्था बदलली आहे. गावच्या आदर्श ग्रामिण सहकारी पतसंस्था या संस्थेत गावच्या दहा कोटी रुपयांच्या ठेवी ठेवल्या आहेत. महिला बचत गटांचे सात गट असून त्यांच्या 10 लाख रूपयांच्या ठेवी आहेत. माजी सैनिक महिला स्वयं सहायता बचत गटांच्या 16 लाख रुपयांच्या ठेवी आहेत. 19 लाख 22




हजार रुपये कर्ज वाटप आहे. हे चित्र आज एका दुष्काळी गावचे आहे ज्या गावातील लोक एकेकाळी गावात मजुरी नाही म्हणून बाहेर मजुरीसाठी जात होते, अर्धपोटी जीवन जगत होते.

कधीकधी जेव्हा गावची अर्थव्यवस्था बदलते तेव्हा काही माणसांची नितीमत्ता

खाली येते. असेही चित्र जनतेमध्ये पहायला मिळते. व्यसनांचे प्रमाण वाढलेले दिसते. मी आणि माझं यापलीकडे त्यांची पाहण्याची दृष्टी जात नाही. असे चित्र पाहायला मिळते. राळेगणसिद्धी परिवाराने या गोष्टीचे पथ्य सांभाळले आहे. गावात 35 ते 40 दारूच्या भट्ट्या होत्या. अशा राळेगणसिद्धी गावात आज दहा ते बारा किराणा दुकाने आहेत. गेली वीस वर्षे झाली कोणत्याही दुकानांमध्ये सिगारेट, बिडी, तंबाखू आणि गुटखा विक्रीलाच ठेवले नाही. वीस वर्षापूर्वी होळीचा सण आला होता. गावच्या तरुणांनी गावात ग्रामसभा घेतली आणि निर्णय घेतला की फक्त लाकडे, गोवऱ्या जाळून होळी साजरी करणे ही खरी होळी नव्हे. ही तर प्रदूषण वाढवणारी होळी आहे. होळी ही दुर्गुणांची आणि दुर्विचारांची होणे आवश्यक आहे. त्यामुळे गावच्या सर्व तरुणांनी दुकानदारांना बोलावून त्यांच्याशी विचार विनियम केला आणि सर्व दुकानांमधील विक्रीला ठेवलेली सिगारेट, बिडी, तंबाखू आणि गुटखा दुकानदारांना पैसे देऊन विकत घेतले आणि त्याची होळीच्या दिवशी होळी केली. तेव्हापासून गेले वीस वर्ष गावात कोणत्याही दुकानात सिगारेट, बिडी, तंबाखु, गुटखा विक्रीला ठेवत नाहीत. सिगारेट, बिडी पिऊन किंवा तंबाखू, गुटखा खाऊन कोणी तरूण पैलवान झाल्याचे ऐकण्यात नाही. मात्र कर्करोग झाल्याची उदाहरणे आहेत. ज्या वस्तूंचा शरीराला काहीच उपयोग नाही उलट शरीराची हानी होते अशा वस्तूंचा आपण उपयोग करून रोगाला आमंत्रण देणे ठीक नाही अशा विचाराने हा निर्णय घेण्यात आला. कधीकधी काही गावांमध्ये असेही चित्र पाहायला मिळते की पाणलोट क्षेत्र विकास झाला, शेतीमध्ये पाणी वाढले, पैसा वाढला की गावात नशा आणणारे पाणी वाढते आणि पाणलोट क्षेत्र विकासाचा पाण्यापासून वाढलेला पैसा नशा आणणाऱ्या पाण्यात जातो मग विकास कसा होणार?




राळेगणसिद्धी परिवाराचा पाणलोट क्षेत्र विकासामुळे पैसा वाढत गेला. मात्र त्या पैशांचा राळेगणसिद्धी परिवाराने योग्य प्रकारे उपयोग केला. आरसीसीचे भव्य श्री यादवबाबा समाधी मंदिर बांधले. ज्याची किंमत 50 लाखापेक्षा जास्त होईल. पद्मावती देवीच्या मंदिराचा जीर्णोद्धार केला. महादेव मंदिराचा जीर्णोद्धार केला. भैरवनाथ मंदिर नव्याने बांधले. फार जुने गणेश मंदीर आहे त्या मंदीराचा जिर्णोद्धार केला आहे. मराठी शाळा नव्याने बांधली. माध्यमिक विद्यालयाची इमारत 75 ते 80 लक्ष रुपये किमतीची

आहे. एक रुपया सुद्धा सरकार किंवा कोणाची देणगी घेतली नाही. व्यायाम शाळा, मंगल कार्यालय आणि स्मशानभूमी अशा विविध इमारती ज्यांची किंमत कोटी रुपयापेक्षा जास्त होईल. 'गावकरी ते राव न करी' अशी म्हण आहे. गावकऱ्यांनी स्वबळावर या इमारती उभ्या केल्यामुळे या कामाशी गावकऱ्यांचे आपलेपणाचे नाते


संत यादवबाबा मंदिर


पद्मावती मंदिर

निर्माण झाले. त्याचा सांभाळ तेच करीत असतात. कारण आपलेपणाची भावना निर्माण झाली. हे आपले आहे असे समजुन गावचे लोक सांभाळतात. आज अनेक गावातील सरकारी इमारतीच्या खिडक्या दरवाजे काढून नेले तरी कुणी विचार करीत नाही. अशी अनेक गावची अवस्था आहे. अशा अवस्थेत गावच्या विकासाची ही सर्व कामे करीत असताना राळेगणसिद्धी परिवाराने बाहेरच्या कोणाच्याही देणग्या घेतल्या नाही. कारण विनोबाजी म्हणत होते दान हे माणसाला नादान करते, हात पसरवायला शिकवते. त्यामुळे माणसांमध्ये लाचारी निर्माण होते. माणसांना स्वाभिमान शिकवायला हवा स्वाभिमान ही आमची उच्च परंपरा आहे. लाचारी नको. प्रश्न उभा राहतो की इतर बाहेरच्या गावांनीही देणग्या घेऊ नये का? सर्व गावांना राळेगणसिद्धीचे अनुकरण करता येणे शक्य नाही पण ज्याप्रमाणे घरांमध्ये रांगणारे बालक आहे त्याने आपल्या पायावर चालायला शिकावं यासाठी पालक त्या बालकाला पांगुळगाडा करून देतात. पांगुळगाड्याच्या आधाराने ते बालक चालायला शिकते. चालायला शिकल्यानंतर पांगुळगाडा सोडून द्यायला पाहिजे. आयुष्यभर पांगुळगाडा घेऊन चालायची सवय झाली की माणसं आयुष्यभर पांगळीच राहतात.

गावाचा विकास करीत असताना उंच इमारती उभ्या करणे म्हणजे विकास नव्हे. उंच इमारती ज्या माणसांसाठी बांधायच्या आहेत ती माणसे उभी झाली पाहिजे. मी माझ्यासाठी जगत असतांना माझा शेजारी आहे, माझा समाज आहे, माझा गाव

आहे त्यासाठी माझ्या प्रपंचातून मी एक तास, दोन तास, तीन तास शक्य होईल तेवढा वेळ त्यांनी गावासाठी दिला पाहिजे हा खरा विकास आहे. इतिहास ही आम्हाला सांगतो आहे की माणसांनी वैयक्तीक जीवनात लखपती होऊ द्या, करोडपती होऊ द्या फक्त स्वत:साठी जगणारे माणसे कायमची मरतात. जी माणंस आपला शेजारी, गाव, समाज. देश असा विचार करून समाज व गावासाठी करता करता मरतात अशी माणस कायमची जगतात. म्हणून प्रत्येक माणसाने काही वेळ आपल्या गावासाठी देणे आवश्यक आहे. आम्ही जन्माला येताना रडत आलो पण लोकांनी खुशी मनावली. बारसे घातले, पेढे वाटले. आता प्रत्येकाने जाताना आपण हसत जाव आणि लोकांनी रडावं असे काम करावे. शंभर वर्षे जगला पण बरं झाले ब्याद गेली असे लोक म्हणत असतील तर अशा जगण्याला काय अर्थ?

**गावा–गावासी जागवा। भेदभाव हे समूळ मिटवा**
**उजाळा ग्राम उन्नतीचा दिवा। तुकड्या म्हणे॥**

गाव एक परिवार अशी भावना वाढीला लागावी यासाठी जातीपातींचा भेदभाव मिटावा यासाठी गावात जे मागासवर्गीय समाज होता त्यांना पूर्वी गावातील मंदिरात प्रवेश नव्हता, पिण्याच्या पाण्यासाठी एक स्वतंत्र विहीर होती. गावची सामुहिक जेवण पंगत असेल तर त्यांना जेवणासाठी स्वतंत्र बसविले जात होते. गावातील मागासवर्गिय समाजाचे 60 हजार रुपये बँकेचे कर्ज झाले होते ते त्यांना फिटत नव्हते. गावच्या ग्रामसभेमध्ये निर्णय झाला की, आपण गावाने त्यांच्या जमिनीमध्ये श्रमदान करुन उत्पन्न वाढवून त्यांचे कर्ज फेडू. दोन वर्षे गावचे लोक त्यांच्या जमिनीवर श्रमदानाला गेले. उत्पन्न काढले आणि त्यांचे कर्ज गावच्या लोकांनी फेडले. त्यामुळे एक गाव एक कुटुंब अशी भावना वाढीला लागली.

## एक आगळा वेगळा बैलपोळा

गावामध्ये दरवर्षी बैलपोळ्याच्या सणाला गावच्या वेशीमधून प्रथम कुणाचा बैल निघावा म्हणून मतभेद होत असत. कधी कधी मारामाऱ्या होत असत. आता गेली वीस वर्षे वेशीमधून दलीत सामाजाचा मानाचा बैल निघतो त्यानंतर गावाचे बैल निघतात. गावच्या सर्व कामामध्ये मागासवर्गीय समाजाची माणस असतात. गावामध्ये भेद राहीला नाही. जेवणाच्या पंगतीला सर्वच एकत्र असतात. जेवण तयार करायला,

जेवण वाढायला सर्व जातींचे लोक एकत्र असतात. गावचे सामुहिक कार्यक्रम होतात त्यासाठी पत्रीका काढताना त्या पत्रीकेमध्ये शेवटी राळेगणसिद्धी परिवार असे लिहले जाते. इतर कुणाचे नाव नसते.

## गावचा वाढदिवस

माणसं दरवर्षी आपला वाढदिवस साजरा करतात. पण राळेगणसिद्धी परिवार दरवर्षी आपल्या गावाचा वाढदिवस साजरा करतो. अशा विचारातून राळेगणसिद्धी गाव म्हणजे एक परिवार निर्माण झाला. गावातील सर्वात जास्त वय झालेले वयोवृद्ध स्त्री आणि वयोवृद्ध पुरूष हे आपल्या गावचे माता आणि पिता समजून गावातर्फे त्यांना नवीन कपडे घेतले जातात. त्यांचे गावाकडून आपले माता पिता समजून




त्यांचे पुजन केले जाते. ते कोणत्याही जातीचे असो ते आमचे माता आणि पिता आहेत. गावात एक वर्षात जी मुले जन्माला आली आहेत त्या सर्व मुलांना गावातर्फे नवीन कपडे शिवले जातात. त्यांचा सन्मान केला जातो. कारण ही मुले आमच्या गावाची, देशाची संपत्ती आहे. गावात एक वर्षात ज्या युवकांची लग्ने झाली आणि ज्या विवाहीत मुली आपल्या गावात आल्या त्या लग्न झालेल्या सुना कुटूंबाच्या आहेत, पण त्या गावच्या सुना आहेत. अशा सर्व सुनांची साडी-चोळी, खण, नारळाने वोटी भरण करतात. कारण त्या आपल्या गावच्या सुना आहेत. गावातील ज्या युवकांनी विविध क्षेत्रामध्ये नैपुण्य मिळविले असेल अशा युवकांचा शाल, श्रीफळ व प्रमाणपत्र देऊन सन्मान केला जातो.

गावातील विविध क्षेत्रातील माणसांनी योगदान दिले असेल अशा क्षेत्रातील माणसांचा कृतज्ञतेच्या भावनेतून सन्मान केला जातो आणि कार्यक्रमाच्या शेवटी गावातर्फे सर्व परिवाराला भोजन दिले जाते. या कार्यक्रमामुळे आम्ही सर्व ग्रामस्थ एक परिवार आहोत ही भावना वाढीला लागते. स्वार्थ वाढत चालल्यामुळे मतभेद राहू शकतात. पण घरामध्ये ज्याप्रमाणे भांड्याला भांडे लागल्यानंतर आवाज निघतो आणि नंतर तो शमतो त्याप्रमाणे मतभेद विसरून जातात. हा फरक होतो.

गावातील ग्रामदैवत पद्मावती देवीची यात्रा वर्षानुवर्षे भरत असते. पूर्वी यात्रेच्या दिवशी बकरे, कोंबडे यांचे बळी दिले जात होते. गावच्या युवकांनी 35 वर्षापूर्वी निर्णय घेतला की बकरे, कोंबडे बळी देणाऱ्यांच्या भावना असतील. आपण त्यांच्या भावनेच्या आड न जाता ज्या लोकांना देवीला बकरे, कोंबडे यांचे बळी द्यायचे आहेत त्यांनी बळी द्यावा पण देवीच्या नावाने बळी देताना सर्व देवीलाच अर्पण कराव. तुम्ही खाऊ नका. तरूणांनी गाडीभर लाकडे आणून देवीच्या मंदीरासमोर त्या लाकडांचा होम रचला आणि बळी देणाऱ्या लोकांना सांगितले की, देवीच्या नावाने कापलेले कोंबडे, बकरे लाकडांच्या केलेल्या होममध्ये टाकावीत ते खाऊ नयेत. तूम्ही देवीच्या नावाने बळी देता तर देवीला अर्पण करा. खायचे नाही म्हटल्यानंतर एकाने ही बकरे, कोंबडे कापले नाहीत. सर्व परत घेऊन गेले. देवीच्या नावाने पशुबळी द्यायचा आणि पाहुण्यारावळ्यांना बोलावून दोन दिवस मेजवाणी ही कसली सेवा किंवा भक्ती ठरणार? आज 35 वर्षे झाली देवीला पुरणपोळीचा नैवद्य दिला जातो. देवीने राळेगणसिद्धी परिवाराचे काहीही वाईट न करता चांगलेच केले आहे. संत तुकडोजी महाराज म्हणतता,

**देवाचीया नावाखाली । काही देतात जीवबळी**
**बंद करावी प्रथा असली । भावना सुधारोनी लोकांची ॥**

## वेस्ट मधून बेस्ट

राळेगणसिध्दीच्या माध्यमिक विद्यालयामध्ये एक हजार विद्यार्थी आहेत. वसतिगृहामध्ये 300 निवासी विद्यार्थी आहेत. या सर्व विद्यार्थ्यांचे युरीन, लॅटरीन, स्वयंपाक गृहातील खरकटे, प्लेट धुवून निघालेले खरकटे यासाठी 6 ते 7 सेफ्टीक टँक तयार करून हे सर्व वेस्ट मटेरियल सेफ्टीक टँकमध्ये सोडले जाते आणि त्याची प्रक्रिया होऊन जे खत तयार होते ते परिसरातील सर्व वृक्षांना ठिबक सिंचनाद्वारे दिले जाते. जे वेस्ट होते ते बेस्ट झाले आहे.

## 2 मेगावॅट सोलर प्रोजेक्ट

आपल्याला सुर्यप्रकाश आणि वारा ही चांगली देण मिळाली आहे. म्हणून पूर्वी राळेगणसिध्दीमध्ये वसतिगृह, हिंद स्वराज ट्रस्ट, स्वयंपाकगृह आणि बाथरूमसाठी सोलर सिस्टम बसवली आहेत. आता 2 मेगावॅटचा मोठा सोलर प्रोजेक्ट करून 5 ते


सौर उर्जा प्रकल्प (सोलर)

6 गावांना विज पुरवठा केला जातो. सोलरचा उपयोग काळाची गरज आहे. नवीनच हिंद स्वराज ट्रस्टमध्ये ऑफिस आणि सर्व खोल्यांना जी महामंडळाची विज वापरली जाते तिचे महिन्याला आठ हजार रूपये बिल येत होते. आता 15 किलोवॅट सोलरवर विज निर्माण होत असल्याने दरवर्षी 1 लाख रूपये विज बील वाचले आहे. यासाठी एकदाच खर्च करावा लागतो. प्रदुषण होत नाही.

हिंद स्वराज ट्रस्ट राज्यातील, देशातील विविध स्तरातील लोकांना पाणलोट क्षेत्र विकास, ग्रामविकास प्रशिक्षण देण्याचे काम करतात. आज पर्यंत गेल्या वीस वर्षात राज्यातील 22 हजार लोकांना प्रशिक्षण दिले आहे. राळेगणसिध्दी परिवाराला गेल्या तीस वर्षात जे रोख पुरस्कार मिळाले आहेत यामध्ये अमेरीका, दक्षिण कोरिया, कॅनडा, सुदान आणि आपल्या देशातील विविध स्तरातून कोटी रुपयांचे पुरस्कार मिळाले त्यांचा स्वामी विवेकानंद कृतज्ञता निधी हा ट्रस्ट आहे. त्यातुन सामाजिक कार्य केले जाते. ज्या समाजाने आपल्याला दिले आहेत ते त्या समाज्यालाच परत करण्याचा प्रयत्न आहे.

## संत यादवबाबा शिक्षण प्रसारक मंडळ

या नावाने संस्था रजिस्टर करून 5 वी ते 12 वी पर्यंत शाळा चालवितली जाते. सदर शाळेसाठी 8 शेतकऱ्यांनी 12 एकर जमीन शाळेला दान दिली आहे. सरकार किंवा बाहेरच्या कोणाच्याही देणग्या न घेता राळेगणसिध्दी परिवाराने आपल्या


श्री संत निळोबाराय माध्य. व उच्च माध्यमिक विद्यालय

अथक परिश्रमाने 75 ते 80 लक्ष रूपये किंमत होईल एवढी इमारत उभी केली आहे. 'गांव करी ते राव न करी' ही म्हण आहे. या शाळेत नापास होणारी सिगारेट ओढणारी, तंबाखू खाणारी, गूटखा खाणारी अशा उनाडक्या करणाऱ्या मुलांना प्रवेश



संगणक कक्ष
(माध्य. व उच्च
माध्यमिक विद्यालय)



संगणक कक्ष
(जि. प. प्राथमिक शाळा)



लेझीम



कबड्डी



रोप मल्लखांब



झांज पथक



एन. सी. सी.



मल्लखांब

दिला जातो. चांगल्या मुलांनाच चांगले करणे हे वैशिष्ट्य नाही तर जी मुले वायाला चालली आहेत, पालकांच्या कक्षेबाहेर गेली आहेत अशा मुलांना प्रवेश देऊन त्या मुलांवर संस्कार करून त्यांना घडविणे हे महत्वाचे काम राळेगणसिध्दी परिवार करते. अशा मुलांना घडविणे हे सोपे काम नाही. फार अवघड काम आहे. पण राळेगणसिद्धी परिवाराने अल्पसा प्रयोग केला आणि यशस्वी झाला.

राळेगणसिद्धी परिवाराने गेल्या 40 वर्षात ग्रामविकासाचे वेगवेगळे कार्य केले त्या ग्रामविकास कामांची येणाऱ्या लोकांना माहिती मिळावी यासाठी माहिती केंद्र उभे



जि. प. प्राथमिक शाळा



डी. बी. एम. इंग्लीश मिडियम स्कूल

केले आहे. सदर माहीती केंद्रामध्ये राळेगसिद्धी येथे झालेल्या सर्व ग्रामविकासाची व विकास कामांची माहिती देण्यात आली आहे. काही लिखाण केले आहे.

त्याचप्रमाणे गेल्या 30 वर्षात जनहितासाठी भ्रष्टाचाराला आळा बसावा यासाठी माहितीचा अधिकार, दप्तर दिरंगाई, लोकपाल, दारूबंदी, जनतेची सनद, ग्रामसभेला जादा अधिकार, ग्रामरक्षक दल यासाठी यासारखे दहा कायदे झाले आहेत. त्याचा राज्य आणि देशातील जनतेला लाभ होत आहे. त्या गेल्या 35 वर्षात किती आंदोलन झाली त्या सर्व आंदोलनाची राळेगणसिद्धी गाव पाहण्यासाठी येणाऱ्या लोकांना माहिती मिळावी यासाठी माहिती देणारे आंदोलनाचे माहिती केंद्र उभे केले आहे. या दोन्ही माहिती केंद्रासाठी राज्यातुन, देशातुन, परदेशातुन कोणाच्याही देणग्या घेतल्या नाहीत. त्यासाठी भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन न्यास नावाचा ट्रस्ट करण्यात आलेला असून धर्मदाय आयुक्तांकडे रजिस्टर केलेला आहे. हा ट्रस्ट आणि राळेगणसिद्धी परिवार आणि राज्यातील विविध भागातील कार्यकर्ते यांच्या तर्फे हे आंदोलन चालविले जाते. आंदोलनाची जनतेला माहिती मिळावी यासाठी चाळीस लाख रुपये खर्च करून तीस वर्षात केलेल्या आंदोलनाची माहिती देणारे स्वतंत्र माहिती केंद्र उभारले आहे. उद्देश एवढाच आहे की ग्रामविकास आणि ग्रामविकासाला लागलेली भ्रष्टाचाराची गळती या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. या दोनही गोष्टी केल्याशिवाय गाव, समाज देशाला उज्वल भविष्य मिळणार नाही. म्हणून गावात ही दोन माहिती केंद्र उभी केली आहेत. त्यासाठी दीड लाख रुपये खर्च केला आहे. तरूण कार्यकर्त्यांना प्रेरणा मिळावी हाच उद्देश.

गावामध्ये श्री संत यादवबाबा मंदिरामध्ये दर वर्षी सात दिवस **अखंड हरिनाम सप्ताह** साजरा होतो. सात दिवस किर्तनकार, प्रवचनकार येऊन गावकऱ्यांचे अध्यात्मिक




प्रबोधन करतात. दररोज दिड ते दोन हजार लोकांचे जेवण तयार केले जाते. दर दिवस गावचे लोक जेवणाच्या पंगती वाटून घेत असतात. त्यातही आपणाला पंगत मिळावी म्हणून स्पर्धा असते. गावचे ग्रामदैवत पद्मावती देवीचा यात्रोत्सव दर वर्षी साजरा होतो. त्याचप्रमाणे नवरात्रोत्सवामध्ये दहा दिवस किर्तनाचा, प्रवचनाचा  कार्यक्रम होत असतो. त्या दहा दिवसात सर्व गावाला दररोज किर्तनानंतर भोजन असते. उपवास करणाऱ्यांना फराळ असतो. गावचे लोक जेवणाच्या पंगती वाटून घेत असतात. यावर्षी तर पुढील वर्षाच्या जेवण पंगती या वर्षीच लोकांनी वाटून घेतल्या आहेत.

गावातील काही तरूण एकत्र येवून '**एक गाव एक गणपती**' अनेक वर्षापासून साजरा होतो. भैरवनाथांचा उत्सव साजरा होतो. राष्ट्रीय पुरूषांच्या जयंती पुण्यतिथी साजरी होते. अशा प्रकारचे अनेक कार्यक्रम राळेगणसिध्दी परिवार साजरे करत असते. पण सर्व स्वेच्छेने चालले असतात. वर्गणी केली जात नाही.

राळेगणसिध्दी परिवार आणि भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन न्यास यांनी वाढत्या भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी राज्यात आणि देशात अहिंसेच्या मार्गाने धरणे, मोर्चे मौन उपोषणे करून राज्य आणि देशासाठी 10 कायदे करायला सरकारला भाग पाडले. त्यामुळे राज्यातील आणि देशातील भ्रष्टाचार संपला नसला तरी भ्रष्टाचाराला मोठ्या प्रमाणावर आळा बसला. करोडो रूपये खर्च करूनही लोकजागृती झाली नसती ती लोकजागृती झाली. अशी ग्रामविकासाची कामे प्रत्येक गावात प्रत्येक तरूण करू शकतो. फक्त तरूणांचे आचार शुद्ध असावे, विचार शुद्ध असावेत, जीवन निष्कलंक असावे, जीवनात थोडा त्याग असावा व अपमान पचविण्याची शक्ती असावी. आणि सत्याचा मार्ग सोडू नये. तरूणांनी ठरविले तर देशाचे उज्वल भविष्य दूर नाही. दाण्याने भरलेले भरघोस कणीस पाहण्यासाठी आधी एका दाण्याला जमिनीत गाडून घ्याव लागते हा प्रकृतीचा नियम आहे. एक दाणाचं जमिनीत गेला नाही तर कणीस कसे दिसणार? जे दाणे जमिनीत जात नाहीत ते दाणे पिठाच्या गिरणीत जातात.

भरडतता आणि नष्ठ होऊन जातात. मात्र जमिनीत जाणारे दाणे नष्ट होत नाही. ते हजारो दाण्यांना निर्माण करीत असतात.

तरूणांनी ठरविले पाहिजे की जमीनीत जायचे की पिठाच्या गिरणीत जाऊन पिठ करून घ्यायच. अण्णा हजारेनी वयाच्या 25 व्या वर्षी भर तारूण्यात स्वामी विवेकानंदाच्या, महात्मा गांधीजींच्या विचाराची प्रेरणा घेवून ठरविले की एक दाणा बनून जमिनीत गाडून घ्यायच. आज राळेगणसिध्दी सारख गाव दाण्याने भरलेल्या कणसांसारखे दिसायला लागले. गेल्या 13 वर्षामध्ये राज्य, दे श् विदेशातून 12 लाख लोकांनी या गावाला भेट देऊन प्रेरणा घेतली प्रेरणा घेतली आहे.




आपलं गाव ही राळेगणसिध्दी सारखे होऊ शकते. अशक्त नाही पण फक्त भाषणाने होणार नाही. भाषणाला कृतीची जोड देणारी लिडरशीप उभी व्हावी लागेल. लोकांना शब्दाने सांगत असताना लोक सांगणाऱ्याकडे पहात असतात. आम्हाला सांगणारा माणूस सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत पहात असतात. ते काय खातात, काय पितात, कसे चालतात, कसे बोलतात इकडे गावकऱ्यांचे लक्ष असते. म्हणून सांगणाऱ्या माणसाचे आचार शुध्द असावे, विचारही शुध्द असावे, जीवन निष्कलंक असावे, वाईट गोष्टींचा जिवनात दाग असू नये, थोडा त्याग असावा आणि आपली कोणी निंदा करतो, आपला अपमान करतो तो अशा वेळी अपमान पचविण्याची शक्ती आपल्या लिडरशीप मध्ये असावी. हे गुण असतील तर राळेगणसिध्दी पेक्षाही अधिक चांगल गाव आपले होऊ शकते.

अण्णा हजारे सारखा 25 वर्षाचा एक अल्पशिक्षीत तरूण जीवनाचे ध्येय ठरवून कामाला लागला आणि धन नाही, दौलत नाही, सत्ता नाही एका मंदिरात राहून फकिरी जीवन जगणारा ज्याला आपले बँक अकाऊंट चे पुस्तक कुठे असते ते माहित नाही. मिळणाऱ्या सैन्यातील पेंशनवर जीवन जगणारा तरूण पण ध्येयवादी बनून मनात आणले तर आपले गाव, समाज, राज्य आणि राष्ट्रासाठी किती मोठे काम करू शकतो. हे उदाहरण आहे.

याचा अर्थ प्रत्येक तरूणाने लग्न करू नये. मंदीरात रहावे असा संदेश नाही तर लग्न करावे प्रपंच करावा पण लहान प्रपंच करता करता मोठा प्रपंच करावा. लहान प्रपंच मध्ये दुःख असते. मोठ्या प्रपंचामध्ये आनंद असतो. असा फरक आहे.


हरणांचा कळप

73 व्या घटना दुरूस्तीप्रमाणे सत्तेचे विकेंद्रीकरण करून ती सत्ता लोकशाही मार्गाने नागरिकांच्या हाती कशी जाईल हा विचार करण्यात आला आहे. कारण लोकशाहीचा अर्थच असा आहे की लोकांची, लोकांनी, लोक सहभागातून चालविलेली ती लोकशाही. त्यासाठी आज 73 व्या घटना दुरूस्ती होऊन सत्तेचे विकेंद्रीकरण करून ग्रामविकासाचा पैसा वित्त आयोगाच्या माध्यमातून सरळ प्रत्येक गावच्या ग्रामपंचायत मध्ये जमा होत आहे. पूर्वी राज्य, जिल्हा परिषद, पंचायत समिती असा येत होता. आता ग्रामपंचायतींची जबाबदारी आहे आहे की हा पैसा जनतेचा असल्याने आणि ग्रामसभा ही दिल्लीची किंवा राज्याची संसद असते त्याप्रमाणे ग्रामसंसद असल्याने गावच्या ग्रामसभेला विचारूनच पैसा हा ग्राम विकासाठीच खर्च व्हायला पाहिजे. महाराष्ट्र शासनाने कायदा केला आहे की गावात आलेला विकास कामांचा पैसा ग्रामसभेला न विचारता ग्राम पंचायतीने परस्पर खर्च केला तर गावातील 20 टक्के मतदार चौकशीचा अर्ज जिल्हा परिषद सीईओ यांच्याकडे करतील. एका महिन्यामध्ये चौकशी होईल. ग्रामसभेला न विचारता ग्रामपंचायतीने परस्पर खर्च केला असेल तर सरपंच, उपसरपंच डिसमीस होतील. म्हणून गावात आलेला विकास कामाचा पैसा ग्रामसभेला विचारूनच खर्च करायला हवा. ही आहे खरी लोकशाही. राळेगणसिद्धी परिवार गेल्या चाळीस वर्षे ग्रामसभेला विश्वासात घेऊनच सर्व योजना राबवीत असल्यामुळे पारदर्शकता निर्माण होऊन विकासाला गती मिळाली आहे. कोणाला ही संशय घेण्यास वाव नसतो.

गावच्या सर्वांगिण विकासासाठी ग्रामसभाचा निर्णय अंतिम निर्णय समजला जावा. कारण आमच्या घटनेच्या 243/क मध्ये स्पष्ट म्हटले आहे की ग्रामसभा ग्राम पातळीवर राज्याचे विधीमंडळ कायद्याद्वारे तरतुद करील अशा अधिकाराचा वापर करू

शकेल व अशी कार्य करू शकेल. गावच्या ग्रामपंचायती पेक्षा ग्रामसभा ही श्रेष्ठ आहे. एवढेच नाही तर लोकसभा, विधानसभा यांच्या पेक्षा ही ग्रामसभेचे स्थान सर्वश्रेष्ठ आहे. कारण आपले लोकसभा सदस्य यांना निवडून पाठविणारी ग्रामसभा आहे. विधानसभा सदस्यांना निवडून पाठविणारी ग्रामसभा आहे. लोकसभा आणि विधानसभा यांची ग्रामसभा ही जननी आहे. असे म्हटले तर वावगे होणार नाही. ग्रामसभा कोणी बनविलेली नाही. ती घटनेने तयार करून ठेवली आहे. प्रत्येक (ग्रामसभा सदस्य) मतदार 18 वर्षे वय झाले की मतदान करण्याचा अधिकार प्राप्त होतो. एकदा तो मतदार झाला की मरेपर्यंत मतदार असतो. म्हणजे ग्रामसभेचा सदस्य असतो. ज्या दिवशी तो मरण पावतो त्या दिवशी त्याचे ग्रामसभेचे सदस्यत्व, मतदार सदस्य संपते. म्हणजेच ग्रामसभा ही कोणी तयार केलेली नसुन स्वयंभू व सार्वभौम आहे. ती कधी बदलत नाही. उलट ही ग्रामसभा ग्रामपंचायतीला विधानसभेला, लोकसभेला प्रत्येक पाच वर्षाने बदलत असते. ती स्वतः कधी बदल नाही. असे ग्रामसभेचे स्थान आहे. ज्याप्रमाणे लोकसभा देशाची संसद आहे. विधानसभा राज्याची संसद आहे त्याप्रमाणे ग्रामसभा ही गावची संसद आहे. ती ग्रामसभा ग्रामपंचायतीपेक्षा श्रेष्ठ आहे. म्हणून ग्रामपंचायतीने ग्राम विकासाचा आलेला निधी फक्त ग्रामपंचायत अकाउंटला जमा करायचा असून खर्च करताना ग्रामसभेला विचारूनच खर्च करायचा आहे. अन्यथा गावचे लोक जागृत झाले तर ज्या गावची ग्रामपंचायत ग्रामसभेला विश्वासात न घेता आपल्या मर्जीप्रमाणे पैसा खर्च करील अशा ग्रामपंचायतीला लोक कायद्याने डिसमीस करतील.

संपर्क

**भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन न्यास**

मु. पो. राळेगणसिद्धी, ता. पारनेर, जि. अहमदनगर ४१४३०२

☎ ९१-०२४८८-२४०४०१ annahazareoffice@gmail.com

Facebook Page: www.facebook.com/KBAnnaHazare

**www.annahazare.org**